## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. २२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०१/२०१७

**१) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे, एक जखमी. :—**

दिनांक ०८/०१/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील जखमी सिताराम सैतु वैरागडे वय ७५ वर्ष रा. मोहदुरा हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३५ ई २६४३ हिरो होंडा स्पलेंन्डन शाहापुर वरुन भंडारा कडे एनएच ०६ रोडने जात असतांना यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमीचे मोटार सायकलला धडक मारुन जखमी केल्याने व अपघाताची माहीती देता पळून गेल्याने डॉ. रिपोर्ट व चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनी आळे पोस्टे जवाहरनगर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८ भादवी. सहकलम १३४,१८४/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. .

**२) मोटार सायकल निष्काळजीपणे चालवुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०८/०१/२०१७ चे १९.५० वा. यातील आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन राग साईडने येवुन फिर्यादीचे टाटा सुमो गाडी क्र. एमएच ३१ सीएम २१८६ ला धडक मारुन स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी रवी रमेश धकाते वय ४० वर्ष, रा. सहकार नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) अज्ञात ट्रॅक्टर चालकाने बसला मागेहुन धडक बसचे नुकसान करुन पळुन गेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक ०७/०१/२०१७ चे १८.४५ वा. दर. यातील फिर्यादी मोरेश्वर गोंवीदरावजी बडवाईक वय ५७ वर्ष, रा. कुंभारे नगर तुमसर हे एसटी चालक असुन ते बस क्र. एमएच ४० एम ८६२८ ने लेंडेझरी वरुन आलेसुर चिखली मार्गाने येण्यास परत निघुन आलेसुर वरुन ४ किमी पुढे आले असता समोरुन येणाऱ्या अज्ञात आरोपी ट्रॅक्टर चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर हयगयीने चालवुन बसच्या उजव्या बाजुचे मागच्या चाकाचे वरील भागास आलेसुर ते चिखला येथे धडक मारुन ३,०००/—रु. चे नुकसान करुन पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,४२७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ०८/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ७० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, अवैध प्रवासी वाहनावरती ०३ तिन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५२ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.